ePaper
| वर्ष - 8 | अंक - 315 | UDYAM-MH-26-0158827 |

# महाईन्यूज™

www.mahaenews.com | मंगळवार, दि. 24 जून 2025 | पुणे, पिंपरी-चिंचवड आवृत्ती | mahaenews.com | लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

## ठाकरे गटाला आणखी एक धक्का, शेकडो शिवसैनिक अजित पवारांच्या राष्ट्रवादीत



### आतील पानांत


- राहुलच्या शतकावर अथियाची पोस्ट
- इंडियाच्या युवा खेळाडूंचा दुर्मिळ विक्रम
- लढण्याची क्षमता केवळ 'आप'मध्येच!
- 'तू माझ्यापेक्षा तरुण दिसतोस'


## राज्यात 23.27 टक्के क्षेत्रावरील पेरण्या पूर्ण

# दमदार पावसामुळे पेरण्यांमध्ये वाढ!

## राज्यात सर्वांत कमी पेरण्या कोकण विभागात आणि सर्वाधिक पेरण्या पुणे विभागात झाल्या

| मुंबई / पुणे | प्रतिनिधी | महाईन्यूज

**दमदार पावसामुळे राज्यातील पेरण्यांचे प्रमाण वाढले असून, आत्तापर्यंत २३.२७ टक्के पेरण्या पूर्ण झाल्या आहेत. गेल्या वर्षी याच दिवशी १९ टक्के क्षेत्रावर पेरण्या झाल्या होत्या. राज्यात ३३ लाख ५९ हजार ८१ हेक्टर जमिनीवर पेरण्या झाल्या आहेत. राज्यात सर्वांत कमी पेरण्या कोकण विभागात आणि सर्वाधिक पेरण्या पुणे विभागात झाल्या आहेत. कृषी विभागाच्या आकडेवारीवरून ही बाब स्पष्ट झाली आहे. यंदा खरीप हंगामात ऊस वगळून राज्यात ३३ लाख ५९ हजार ८१ हेक्टर जमिनीवर २३.२७ टक्के पेरण्या झाल्या आहेत.**



विभागनिहाय पेरण्यांमध्ये कोकणात १६ हजार ७९ हेक्टर जमिनीवर ४.१० टक्के, नाशिक विभागात पाच लाख नऊ हजार १११ हेक्टर जमिनीवर २५.०४ टक्के, पुणे विभागात चार लाख ५१ हजार ५०७ हेक्टर जमिनीवर ३५.९४ टक्के, कोल्हापूर विभागात एक लाख ६८ हजार ५६८ हेक्टर जमिनीवर २३.२६ टक्के, छत्रपती संभाजीनगर विभागात सहा लाख ५७ हजार १९९ हेक्टर जमिनीवर ३०.६८ टक्के, लातूर विभागात नऊ लाख चार हजार २०२ हेक्टर जमिनीवर ३१.९४ टक्के, अमरावती विभागात पाच लाख ६१ हजार ८८० हेक्टर जमिनीवर १७.७८ टक्के आणि नागपूर विभागात ९० हजार ५३५ हेक्टर जमिनीवर ४.७८ टक्के पेरण्या झाल्या आहेत. राज्यात सर्वांत कमी पेरण्या कोकण विभागात आणि सर्वाधिक पेरण्या पुणे विभागात झाल्या आहेत, अशी माहिती कृषी विभागातर्फे देण्यात आली.

### मुंबईसह उपनगरात मुसळधार; हवामान खात्याकडून येलो अलर्ट जारी

मुंबईत आज मुसळधार पावसाची शक्यता वर्तवण्यात आलेली आहे. पुढील 2 ते 3 दिवस कोकणात देखील जोरदार पावसाचा अंदाज आहे. तसंच मध्य महाराष्ट्रातल्या घाट भागात देखील पावसाचा अंदाज आहे. तर मुंबईसह उपनगरात आज पहाटेपासूनच मुसळधार पावसाला सुरुवात झालेली आहे. वसई, विरार, लोअर परेल भागात जोरदार पावसाच्या सरी बरसत असून नवी मुंबई भागात देखील मध्य रात्रीपासूनच पावसाने जोर धरला आहे. हवामान खात्याकडून आज मुंबईला यलो अलर्ट देण्यात आलेला आहे. कालपासून अनेक ठिकाणी ढगाळ वातावरण बनून असतानाच मुंबईसह उपनगरात आज पहाटेपासूनच पाऊस सुरू झाला आहे. काही मध्यम ते मुसळधार स्वरूपाच्या पावसाच्या सरी बरसण्यास सुरवात झालेली आहे. जून महिन्यात म्हणावा तसा पाऊस बसरलेला नसला तरी जुलै महिन्यात चांगल्या पावसाचा अंदाज आहे. येत्या 2 ते 3 दिवसांत कोकणात देखील जोरदार पावसाचा अंदाज हवामान खात्याने दिला आहे.



### यंदाच्या पावसाळ्यात 19 वेळा समुद्राला येणार मोठी भरती

मोठी भरती असण्याच्या कालावधीदरम्यान नागरिकांनी समुद्रकिनाऱ्याजवळ जाऊ नये, तसेच या मुंबई महानगरपालिकेद्वारे वेळोवेळी देण्यात येणा-या सुचनांचे काटेकोरपणे पालन करावे, असे आवाहन महानगरपालिकेने नागरिकांना पुन्हा एकदा केले आहे

पावसाळ्याला सुरुवात झाली असली तरी यंदाच्या मान्सूनमध्ये उद्या दि.२४ जूनपासून दि. २८ जून २०२५ पर्यंत असे सलग ५ दिवस समुद्राला मोठी भरती येणार आहे.यंदाच्या पावसाळ्यात जून ते सप्टेंबर या ४ महिन्यांच्या कालावधीदरम्यान १९ वेळा समुद्राला मोठी भरती असणार आहे. यावेळी समुद्रात साडेचार मीटरपेक्षा अधिक उंचीच्या लाटा उसळणार आहेत. त्यामुळे नागरिकांना या दिवसात समुद्राच्या किनारी पावसात भिजताना सावधान राहावे असे म्हटले जात आहे. यंदाच्या पावसाळ्यात म्हणजेच जून ते सप्टेंबर या चार महिन्यांच्या कालावधीदरम्यान एकूण १९ वेळा समुद्राला मोठी भरती येणार आहे. या भरती दरम्यान समुद्रामध्ये साडेचार मीटरपेक्षा अधिक उंचीच्या लाटा उसळणार आहेत. या पावसाळ्यातील मोठ्या भरतीचा तपशिल मुंबई महानगरपालिकेच्या आपत्कालीन व्यवस्थापन विभागामार्फत जाहीर करण्यात आला आहे.

### सर्वाधिक उंचीची लाट 26 जून रोजी उसळणार

यामध्ये भरतीचा दिनांक आणि वेळ यासह भरती दरम्यान समुद्रात उसळणा-या लाटांची उंचीदेखील नमूद करण्यात आली आहे. यानुसार यंदाच्या पावसाळ्यात सर्वाधिक उंचीच्या लाटा दि. २६ जून २०२५ रोजी उसळणार आहेत. मोठी भरती असण्याच्या सर्व दिवशी भरती कालावधीदरम्यान नागरिकांनी समुद्रकिनाऱ्याजवळ जाऊ नये, तसेच या मुंबई महानगरपालिकेद्वारे वेळोवेळी देण्यात येणा-या सुचनांचे काटेकोरपणे पालन करावे, असे आवाहन महानगरपालिकेने नागरिकांना पुन्हा एकदा केले आहे.

# मध्यवर्ती’ कोंडी फोडण्यासाठी भुयारी मार्ग!

## चौपदरी मार्गासाठी केंद्राकडून निधीचे गडकरींचे आश्वासन

। पुणे । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**शहराच्या मध्यवर्ती भागातील वाहतूक कोंडीचा प्रश्न सोडविण्यासाठी शनिवारवाडा (काकासाहेब गाडगीळ पुतळा) ते स्वारगेट आणि सारसबाग ते शनिवारवाडा असा चौपदरी भुयारी मार्ग प्रकल्प प्रस्तावित करण्यात आला आहे. या प्रकल्पाचा सविस्तर प्रकल्प अहवाल (डीपीआर) सार्वजनिक बांधकाम विभागाकडून तयार करण्यात येत असून, हा अहवाल अंतिम टप्प्यात आला आहे.**



### हा अहवाल अंतिम टप्प्यात आला

काकासाहेब गाडगीळ पुतळा, शनिवारवाडा मुख्य प्रवेशद्वार येथे भेट दिली.उपयोग होण्याची क्षमता असल्याने आणि ऐतिहासिक वारसा जपणूक म्हणून वाहतूक सुलभीकरणासाठी शनिवारवाडा ते स्वारगेट आणि सारसबाग ते शनिवारवाडा असा 'चौपदरी भुयारी मार्ग' प्रकल्प हाती घेण्यात आला आहे.'समस्येवर कायमस्वरूपी तोडगा म्हणून सुमारे २.५ किलोमीटर लांबीचा हा चार पदरी भुयारी मार्ग प्रस्तावित करण्यात आला आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या सूचनेनुसार सार्वजनिक बांधकाम विभागाकडून सविस्तर प्रकल्प अहवाल (डीपीआर) तयार करण्यात येत असून, हा अहवाल अंतिम टप्प्यात आला आहे.

या प्रकल्पासाठी निधी उपलब्ध करून देण्याबाबत लवकरच संबंधित विभागाच्या अधिकाऱ्यांसह बैठक घेण्याचे आश्वासनही केंद्रीय भूपृष्ठमंत्री नितीन गडकरी यांनी दिले.गडकरी हे पुणे दौऱ्यावर आले असता, त्यांनी काकासाहेब गाडगीळ पुतळा, शनिवारवाडा मुख्य प्रवेशद्वार येथे भेट दिली. आमदार हेमंत रासने यांनी या प्रकल्पाची माहिती देऊन प्रकल्प उभारण्यासाठी निधी देण्याबाबतचे निवेदन दिले. उच्च व तंत्रशिक्षणमंत्री चंद्रकांत पाटील या वेळी उपस्थित होते. आमदार रासने म्हणाले, 'शिवाजी रस्ता आणि बाजीराव रस्ता हे शहरातील मध्यवर्ती मार्ग आहेत. या परिसरात ऐतिहासिक वास्तू, धार्मिक स्थळे, शाळा-महाविद्यालय आणि मोठी बाजारपेठ असल्याने दररोज हजारो वाहनांची वर्दळ असते. या मार्गावर सातत्याने वाहतूककोंडी होते. हे दोन्ही रस्ते दक्षिणोत्तर मार्गाचा महत्त्वाचा दुवा असून, भविष्यात 'लिंक कॉरिडॉर' म्हणून उपयोग होण्याची क्षमता असल्याने आणि ऐतिहासिक वारसा जपणूक म्हणून वाहतूक सुलभीकरणासाठी शनिवारवाडा ते स्वारगेट आणि सारसबाग ते शनिवारवाडा असा 'चौपदरी भुयारी मार्ग' प्रकल्प हाती घेण्यात आला आहे.'शहराच्या मध्यवर्ती मार्गांवरील वाहतूककोंडीच्या समस्येवर कायमस्वरूपी तोडगा म्हणून सुमारे २.५ किलोमीटर लांबीचा हा चार पदरी भुयारी मार्ग प्रस्तावित करण्यात आला आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या सूचनेनुसार सार्वजनिक बांधकाम विभागाकडून सविस्तर प्रकल्प अहवाल (डीपीआर) तयार करण्यात येत असून, हा अहवाल अंतिम टप्प्यात आला आहे. प्रकल्पाच्या निधीसाठी राज्याच्या अर्थ विभागाकडे प्रस्ताव पाठवण्यात आला आहे. त्याचबरोबर केंद्र सरकारकडून निधी मिळावा, यासाठी गडकरी यांना निवेदन देण्यात आले आहे. त्यांनी या प्रकल्पाला सकारात्मकता दर्शवली असून, लवकरच अधिकाऱ्यांबरोबर बैठक घेण्याचे आश्वासन दिले आहे,' असे रासने यांनी स्पष्ट केले.दरम्यान, श्रीमंत बाजीराव पेशवे यांच्या जाज्वल्य इतिहासाचे प्रतीक असलेल्या शनिवारवाड्याला पुन्हा गतवैभव प्राप्त करून देण्यासाठी केंद्र शासनाच्या पातळीवर विशेष मदत मिळावी, अशी विनंतीही रासने यांनी या वेळी केली.

# माळेगाव कारखान्याचा आज फैसला

## अजित पवार उभे असलेल्या गटाचा निकाल सर्वप्रथम

। पुणे । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**बारामतीतील माळेगाव सहकारी साखर कारखान्याच्या निवडणुकीची मतमोजणी उद्या, मंगळवारी (२४ जून) होणार आहे. राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार उभे असलेल्या 'ब' गटाची मतमोजणी सुरुवातीला होणार असल्याने हा निकाल सर्वप्रथम हाती येईल**



### नऊ वाजता मतमोजणीला सुरुवात

या निवडणुकीत राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार) पक्षाचे 'श्री नीळकंठेश्वर पॅनेल', राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार) पक्षाचे 'बळीराजा सहकार बचाव पॅनेल', कारखान्याचे माजी अध्यक्ष, भाजपचे नेते चंद्रराव तावरे आणि रंजन तावरे यांचे 'सहकार बचाव शेतकरी पॅनेल' राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार) पक्षाच्या पॅनेलने युवा नेते युगेंद्र पवार यांच्या नेतृत्वाखाली निवडणुकीचा प्रचार केला.

बारामतीतील प्रशासकीय भवनामध्ये सकाळी नऊ वाजता मतमोजणीला सुरुवात होणार आहे. या कारखान्याच्या निवडणुकीसाठी ८८.४८ टक्के मतदान झाले आहे. १९ हजार ५४९ मतदारांपैकी १७ हजार २९६ मतदारांनी मतदानाचा हक्क बजावला आहे. २१ जागांसाठी ९० उमेदवार निवडणुकीच्या रिंगणात आहेत. 'ब' गटात उपमुख्यमंत्री अजित पवार उमेदवार असून, या गटासाठी ९९ टक्के मतदान झाले आहे.मतमोजणी ३४ टेबलांवर दोन फेऱ्यांत होणार आहे. त्यामध्ये 'ब' गटाची मतमोजणी सुरुवातीला आहे. त्यानंतर टप्प्याटप्प्याने मतमोजणी केली जाणार असल्याचे निवडणूक निर्णय अधिकारी यशवंत माने आणि सहायक निवडणूक निर्णय अधिकारी गणेश शिंदे यांनी सांगितले. 'मतमोजणीच्या ठिकाणी २५० पोलीस अधिकारी आणि कर्मचाऱ्यांच्या नेमणुका करण्यात आल्या आहेत,' अशी माहिती उपविभागीय पोलीस अधिकारी सुदर्शन राठोड यांनी दिली.या निवडणुकीत राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार) पक्षाचे 'श्री नीळकंठेश्वर पॅनेल', राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार) पक्षाचे 'बळीराजा सहकार बचाव पॅनेल', कारखान्याचे माजी अध्यक्ष, भाजपचे नेते चंद्रराव तावरे आणि रंजन तावरे यांचे 'सहकार बचाव शेतकरी पॅनेल' आणि कष्टकरी शेतकरी संघर्ष समितीचे पॅनेल यांच्यात चौरंगी लढत आहे.राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार) पक्षाच्या पॅनेलने युवा नेते युगेंद्र पवार यांच्या नेतृत्वाखाली निवडणुकीचा प्रचार केला. उपमुख्यमंत्री अजित पवार आणि युगेंद्र पवार हे विधानसभा निवडणुकीनंतर दुसऱ्यांदा समोरासमोर आले. त्यामुळे या निवडणुकीच्या निकालाकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.बारामतीतील प्रशासकीय भवनामध्ये सकाळी नऊ वाजता मतमोजणीला सुरुवात होणार आहे. या कारखान्याच्या निवडणुकीसाठी ८८.४८ टक्के मतदान झाले आहे. १९ हजार ५४९ मतदारांपैकी १७ हजार २९६ मतदारांनी मतदानाचा हक्क बजावला आहे. २१ जागांसाठी ९० उमेदवार निवडणुकीच्या रिंगणात आहेत. 'ब' गटात उपमुख्यमंत्री अजित पवार उमेदवार असून, या गटासाठी ९९ टक्के मतदान झाले आहे.मतमोजणी ३४ टेबलांवर दोन फेऱ्यांत होणार आहे. त्यामध्ये 'ब' गटाची मतमोजणी सुरुवातीला आहे. त्यानंतर टप्प्याटप्प्याने मतमोजणी केली जाणार असल्याचे निवडणूक निर्णय अधिकारी यशवंत माने आणि सहायक निवडणूक 'मतमोजणीच्या ठिकाणी २५० पोलीस अधिकारी आणि कर्मचाऱ्यांच्या नेमणुका करण्यात आल्या आहेत,' अशी माहिती उपविभागीय पोलीस अधिकारी सुदर्शन राठोड यांनी दिली.

## पिंपरी महापालिका आरोग्य यंत्रणा अलर्ट

# साथीच्या रोगांबाबत नागरिकांमध्ये जनजागृती!

## पावसाळ्याच्या पार्श्वभूमीवर महापालिकेकडून उपाय योजना

। पिंपरी-चिंचवड ।
महाईन्यूज । प्रतिनिधी।

**पिंपरी चिंचवड: पावसाळा सुरू झाल्याने महापालिकेच्या आरोग्य विभागाकडून शहरातील प्रत्येक घरे, विविध आस्थापना,बांधकाम साईट,भंगार दुकाने यासह विविध ठिकाणी डासांच्या आळ्याची तपासणी करण्यात येत आहे. डेंगी, चिकनगुनिया आणि मलेरियासारखे आजार रोखण्यासाठी डास उत्पत्तीची ठिकाणे नष्ट करुन नागरिकांमध्ये जनजागृती सुरु आहे.**







### साथीचे आजार टाळण्यासाठी सर्वेक्षण आणि जनजागृती

पिंपरी-चिंचवड शहरात पावसाळ्यात वाढणाऱ्या सार्थीच्या आजारांना आळा घालण्यासाठी महापालिकेकडून उपाययोजना सुरु आहेत. डेंगी बीट मोहिमेतून सर्वेक्षण करत नागरिकांमध्ये जनजागृती सुरु आहे. महापालिकेच्या रुग्णालयांत तसेच दवाखान्यांमध्ये डेंगीच्या तपासणी करिता आवश्यक असलेले रॅपिड किट उपलब्ध करुन देण्यात आलेले आहे. किटकजन्य रोग नियंत्रणासाठी स्वच्छ पाण्यात गप्पी मासे सोडणे, शहरातील विविध ठिकाणी पाहणी करून घरांच्या कंटेनरचे सर्वेक्षण, व्यवसायाच्या ठिकाणांचे सर्वेक्षण करण्यासाठी तपासणी पथकांची नेमणूक करून डासांच्या आळ्या आढळून आलेल्या ठिकाणी कारवाई करण्यात येत आहे.

> औद्योगिक, बांधकाम आस्थापना, कार्यालये, गृहसंस्था, घरे तसेच व्यावसायिक दुकानांसह सर्व आस्थापनांनी आपल्या ठिकाणी असलेली डासोत्पत्ती स्थळे तात्काळ नष्ट करावीत अन्यथा कठोर कारवाई केली जाईल. तसेच शहरात सुरू असलेल्या विविध बांधकामांच्या ठिकाणी महापालिकेने विशेष लक्ष केंद्रीत केले असून त्या भागांची तपासणी करून संबंधितांना नोटीसा बजावण्यात येत आहेत. शिवाय अशी ठिकाणे आढळून आलेल्या आस्थापनांवर दंडात्मक कारवाई करण्यात येत आहे.
> **- विजयकुमार खोराटे,** अतिरिक्त आयुक्त, महापालिका

### दहा दिवसात साडेसहा हजार रुग्णांना थंडी ताप

ज्या भागात डेंगीचे रुग्ण जास्त आढळतात, त्या ठिकाणी धूर फवारणी करण्यात येणार आहे. कंटेनर सर्व्हेअंतर्गत डासांची उत्पत्ती स्थानके शोधून नष्ट करण्यात येणार आहे. जून महिन्याच्या सुरूवातीलाच शहरामध्ये डेंगीचे २० संशयित रुग्ण आढळले आहेत. तसेच तीव्र थंडी ताप असलेल्या रुग्णांची संख्या दहा दिवसांमध्ये सहा हजार ८९० रुग्ण आढळले आहेत. या शिवाय चिकनगुनियाचे चार संशयित रुग्ण आढळले आहेत. पावसाचे पाणी साचून त्यामध्ये डासांची उत्पत्ती होते. त्यामुळे पावसाळ्याच्या दिवसांमध्ये साथीच्या आजारांमध्ये वाढ होते.

---

## डॉ. श्यामाप्रसाद मुखर्जींचा त्याग प्रेरणादायी : प्रकाश क्षीरसागर

## डॉ. श्यामाप्रसाद मुखर्जींचे बलिदान हे राष्ट्रनिष्ठेचे सर्वोच्च प्रतीक;1 भाजपतर्फे आदरांजली

। पिंपरी-चिंचवड ।
महाईन्यूज । प्रतिनिधी।


**पिंपरी चिंचवड : डॉ. मुखर्जींनी देशाच्या एकात्मतेसाठी केलेला संघर्ष आणि दिलेले बलिदान हे राष्ट्रनिष्ठेचे सर्वोच्च प्रतीक आहे. 'एक देश, एक विधान, एक निशान व एक प्रधान' या त्यांच्या घोषणेने तत्कालीन परिस्थितीत देशाची एकता टिकवण्यासाठी महत्त्वाचे कार्य केले, जे आजही राष्ट्रनिर्माणासाठी प्रेरणादायी आहे, असे प्रतिपादन राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे प्रकाश क्षीरसागर यांनी केले.**



जनसंघाचे संस्थापक, महान देशभक्त डॉ. श्यामाप्रसाद मुखर्जी यांच्या बलिदान दिनानिमित्त भाजपतर्फे डॉ. मुखर्जींच्या प्रतिमेस पुष्पांजली अर्पण करून त्यांच्या अतुलनीय योगदानाला आदराने स्मरण करण्यात आले. मोरवाडी, पिंपरी येथील भाजपा कार्यालयात उपस्थित मान्यवरांनी डॉ. मुखर्जींच्या विचारांना आणि त्यांच्या राष्ट्रभक्तीला नमन केले. त्यावेळी ते बोलत होते.

यावेळी, डॉ. मुखर्जी यांच्या देशकार्यावरील माहितीपर व्याख्यान आयोजित करण्यात आले होते. कार्यक्रमाचे प्रमुख वक्ते प्रकाश क्षीरसागर यांनी डॉ. श्यामाप्रसाद मुखर्जी यांच्या जीवनातील महत्त्वाचे टप्पे, त्यांचे शिक्षण, कलकत्ता विद्यापीठाचे कुलगुरु म्हणून केलेले कार्य, स्वातंत्र्योत्तर काळात केंद्रीय मंत्री म्हणून त्यांचे योगदान आणि जनसंघाची स्थापना यावर सविस्तर माहिती दिली. काश्मीरच्या एकात्मतेसाठी त्यांनी पुकारलेला संघर्ष आणि त्यासाठी दिलेले बलिदान हे त्यांच्या राष्ट्रनिष्ठेचे सर्वोच्च प्रतीक होते, असे यावेळी आवर्जून नमूद केले. 'एक देश, एक विधान, एक निशान' या त्यांच्या घोषणेने तत्कालीन परिस्थितीत देशाची एकता टिकवण्यासाठी कसे महत्त्वाचे कार्य केले, यावरही प्रकाश टाकण्यात आला. कार्यक्रमाला भाजपा शहराध्यक्ष शत्रुघ्न (बापू) काटे, आमदार उमाताई खापरे, माजी खासदार अमर साबळे, प्राधिकरणाचे माजी अध्यक्ष सदाशिव खाडे, माजी महापौर उषा ऊर्फ माई ढोरे, प्रदेश सदस्य महेश कुलकर्णी, कार्यक्रमाचे संयोजक मोरेश्वर शेडगे, दक्षिण आघाडी प्रदेश अध्यक्ष राजेश पिंल्ले, माऊली थोरात, सरचिटणीस शितल ऊर्फ विजय शिंदे, अजय पाताडे, महिला मोर्चा अध्यक्ष सुजाता पालांडे, वरिष्ठ उपाध्यक्ष राजू दुर्गे, माजी नगरसेविका माधुरी कुलकर्णी, योगिता नागरगोजे, मनोज तोरडमल, युवा मोर्चा प्रदेश सदस्य अजित कुलथे, वैशाली खाडये, अर्जुन ठाकरे, खंडूदेव कथोरे, देवदत्त लांडे, बिभीषण चौधरी, विठ्ठल भोईर, कैलास सानप, मंडल अध्यक्ष मोहन राऊत, हर्षद नढे, गणेश ढोरे, धरम वाघमारे, मंगेश धाडगे, अनिता वाळुंजकर, रामदास कुटे, शिवराज लांडगे, अमोल डोळस, अजित बुर्डे, बबन कांबळे, गोरक्षनाथ झोळ, रवी देशपांडे, सीमा चव्हाण, प्रमोद ब्राम्हणकर, गणेश आर. ढाकणे, संतोष टोणगे, नेताजी शिंदे, दिनेश यादव, महेंद्र बाविस्कर, दिपक भंडारी, दत्ता झुळूक, दत्ता ढगे, सुनील लांडगे, संतोष तापकीर, दत्ता तापकीर, मनिषा शिंदे, रामदास काळजे, गणेश लंगोटे, अभिजीत बोरसे, सचिन राऊत, दीपक नागरगोजे, उदय गायकवाड, राजू मासूळकर, अमेय देशपांडे, संजय परळीकर आदी उपस्थित होते. उपस्थितांनी डॉ. मुखर्जींच्या कार्यापासून प्रेरणा घेऊन राष्ट्रनिर्माणासाठी योगदान देण्याचा संकल्प केला. या कार्यक्रमामुळे नव्या पिढीला डॉ. श्यामाप्रसाद मुखर्जी यांच्या देशसेवेची आणि त्यागाची माहिती मिळाली, असे मत अनेकांनी व्यक्त केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक मोरेश्वर शेडगे यांनी केले. सुत्रसंचालन अजय पाताडे यांनी तर आभार विजय फुगे यांनी मानले.

## श्रीब्रह्मचैतन्य गोंदवलेकर महाराजांची प्रवचने



### हेतू शुद्ध ठेवावा.

मनुष्याने शुद्ध हेतू ठेवण्याचा प्रयत्न करावा. हेतू शुद्ध असला की स्वाभाविकच कृती त्याला अनुरूप होऊ लागते आणि प्रगतीला मदत होते. हेतू हा विहिरीत असणाऱ्या झऱ्याप्रमाणे आहे. झरा गोड पाण्याचा असला म्हणजे विहिरीचे पाणी स्वाभाविकच गोड असते. म्हणून हेतू शुद्ध ठेवण्याची दक्षता घ्यावी, आणि त्याकरिता रामाची प्रार्थना करावी. माणसाला देहरक्षणापुरते अन्न, वस्त्र आणि नाम घेण्याची बुद्धी असली ही असमाधानाला जागा नाही. ‘नको दैन्यवाणे जिणे भक्तिऊणे ’ हेच रामरायाजवळ मागावे. पर्वकाळात भगवंत कामधेनूचा अवतार घेऊन येतो; जे ज्याला पाहिजे ते तो देतो. पर्वकाळात सज्जन तसेच दुर्जनही आपली कामे करून घेतात. जारण-मारण ही देखील पर्वकाळात शीघ्र साध्य होतात. आपण मात्र भगवंताचे कसे व्हावे हे पाहावे. शुभेच्छा धरावी, भावना जागृत करावी. ‘ काहीही कर, पण भगवंता तुझा विसर पडू देऊ नकोस, ’ असे भगवंताजवळ मागावे. ‘ आजवर कळत न कळत जे पाप झाले असेल ते नाहीसे कर. पुढे पुन: नाही करणार, ’ असे म्हणावे, म्हणजे मागली पापे नष्ट होतात. ज्याला विषयाची गोडी असते त्याला नाही परमार्थाची गोडी लागत. नरकातल्या किड्यांना नाही किळस येत. विषयी लोक प्रपंचात रंगून जाऊन साधुसंतांची निंदा करतात. त्यांना ‘ मीच काय तो एक शहाणा, मोठा,’ असा अभिमान असतो. पण त्यांच्यापेक्षा लक्षावधी शहाणे आणि श्रीमंत जगात आहेत हे ते जाणत नाहीत. ते खालच्या लोकांकडे पाहतात आणि त्यांच्याहून मी श्रेष्ठ आहे असे म्हणतात. माझे चुकते आहे एवढे कळले तरी चालेल. विषयी लोकांना ‘मला कुठे दु:ख आहे ?’ असे वाटते. पण दारूप्रमाणे विषयाची धुंदी उतरली म्हणजे पश्चात्ताप होतो. ‘ देव आहे ’ असे खऱ्या अर्थाने वाटणारे जगामध्ये थोडेच असतात. सद्विचार, सच्छास्त्र आणि सद्‌बुद्धी ही प्रत्येक माणसाला याच जन्मात भगवंताकडे नेण्यासाठी आहेत. प्रपंचाचा अनुभव कष्टमय आहे, पण भगवंताचा अनुभव आनंदमय आहे. तापाने आजारी असलेल्या माणसाला आपल्याला घाम यावा असे वाटत असते. पण नुसत्या वाटण्याने काही तो येत नाही, त्यासाठी डॉक्टरचे औषध घ्यावे लागते. तसे, ज्याला भगवंताचे प्रेम यावे असे वाटते, त्याने नाम घेणे हेच एक औषध घ्यावे. भगवंताचे प्रेम एकदा चिकटले की त्याच्या आड दुसरे काही येत नाही. खाणीतल्या दगडामध्ये जसे सोने असते, तसा आपल्यामध्ये परमात्मा आहे. दगडातली माती अनेक चाळण्यांनी आणि यंत्रांनी काढून टाकतात आणि नंतर सोने हाती लागते, त्याचप्रमाणे अनेक वासना नष्ट झाल्यानंतर परमात्मा आपल्या हाती लागतो. आपण ‘ मी ’ पणाने मेल्यानंतर शेवटी परमात्मा प्रकट होतो.

बोधवचन:- शुद्ध असावे आचरण। तसेच असावे अंतःकरण। त्यात भगवंताचे स्मरण। हेच प्रपंच सुखी करण्याचे साधन॥

# बाष्कळ अन् वायफळ बडबड, प्रवक्त्यांमध्ये कोण वरचढ?



‘स्टेट’मेंट

अधिकराव दिवे-पाटील

संस्थापक, संपादक



**सध्या आपल्या राज्याच्या राजकारणात प्रवक्ता पदावर असलेली पक्षाची नेते मंडळी त्या पक्षाला अडचणीत आणण्यासाठी नेमलेली असावीत, असे दिसते. मुळात प्रवक्ता पदाची कार्ये, कर्तव्ये या मंडळींना माहीत नसावीत. आपण पक्षाच्या वतीने काहीही बोलायला तयार आहोत. वाट्टेल ते बोलले तरी चालेल असा काहीसा गैरसमज या मंडळींचा झाला आहे.**

### बेलगाम, बेछूट आणि बेफाम..

संजय राऊत, अमोल मिटकरी, संजय शिरसाट, विजय वडेट्टीवार, सुषमा अंधारे, नितेश राणे, संजय गायकवाड अशी काही मंडळी आहेत, ज्यांना आपण काय बोलतो, हेच समजत नाही. मात्र, बोलल्याशिवाय राहावत नाही, अशी त्यांची अवस्था आहे. थोडक्यात काय, काहीही बोलण्याचा परवाना त्यांना दिला की काय अशी शंका येते.

### उचलली जीभ लावली टाळ्याला..

उद्धव ठाकरे देशाचे पंतप्रधान होणार, अजित पवार राज्याचे मुख्यमंत्री होणार, मोदी पुन्हा जिंकणार नाहीत, शिंदे पुन्हा सत्तेवर नसतील, असे दिवे संजय राऊत आणि मिटकरी यांनी लावले आहेत. आपण केवढे, आपला पक्ष केवढा, यापुढे निवडून किती येतील, या सगळ्याचा विचार न करता आपल्या नेत्याची हांजी हांजी करायची, एवढेच या मंडळींना माहिती आहे. मुळात हा प्रकार नेत्यांना तरी आवडतो का हा खरा प्रश्न आहे. पण प्रवक्ते असल्याने दररोज काही ना काही बोललेच पाहिजे असे त्यांना वाटते, ही खरी गंभीर बाब आहे.

### नेत्याला खुश करण्याचे डोहाळे..

अमोल मिटकरी या आमदारांनी अजितदादांना पुढच्या वर्षी मुख्यमंत्री झालेलं पाहायचं आहे, अशी इच्छा व्यक्त केली. काय मजा आहे ना..अहो, ज्या राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाची सत्तेच्या आजूबाजूला बसण्याची स्वबळाची क्षमता नाही, त्या पक्षातील काही बोलघेवड्या व वाचाळ आमदारांना त्यांच्या पक्षाचे सर्वोच्च नेते अजितदादा पवार हे कधी एकदा महाराष्ट्राचे मुख्यमंत्री होतील, असे डोहाळे लागतात.

### ही तर ‘सेटलमेंट पार्टी..’

पंढरपूर यात्रेच्या निमित्ताने विठू माऊलीचे दर्शन घेऊन पुढच्या वर्षी अजितदादांनी सपत्नीक माऊलींची पूजा करावी, अशी आर्त हाक घातली आहे. याचा अर्थ ‘घरचं झालं थोडं म्हणून व्याहानं घाडलं घोडं’अशी काहीशी चित्र विचित्र अवस्था उपमुख्यमंत्री अजित पवार यांची झाली असल्यास त्यात काही नवल नाही. कारण राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे ख्याती ही ‘सेटलमेंट पार्टी’ म्हणून प्रसिद्ध आहे. या पार्टीचा अभ्यास केला असता त्यांना विकासासाठी सतत चाटणाला सत्तेचा मध हवा असतो. तरच जनतेचा विकास त्यांच्या हातून नकळत होतो, अशी त्यांची धारणा आहे. अर्थात् त्यात काही नवल नाही, पण हे सत्तेत असताना त्यांचं चाटण मधाच्या बोटावर थांबत नाही, त्यासाठी त्यांना मधाचं पोळं हवं असतं !

### केवळ फुल्या आणि फुल्याच!

त्याशिवाय या पार्टीतील सर्वव्यापी लोकप्रतिनिधींचा सर्वांगीण विकास होतच नाही, हे वास्तव कसं नाकारता येईल, कारण या वास्तव्यामुळेच तर माजी उपमुख्यमंत्री छगन भुजबळ आणि माजी गृहमंत्री अनिल देशमुख यांना महिनोंन्महिने तुरुंगात रा हावे लागले ही वस्तुस्थिती आहे.अशा या विपरित परिस्थितीत सुध्दा भाजपा ला राष्ट्रवादी काँग्रेसचे सर्वेसर्वा शरद पवार यांना उतरत्या वयात राजकीय धक्का देण्याची अवदसा सुचली. त्यामुळे, तर राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे दोन तुकडे झाले. त्यापैकी एक सत्तेच्या मैदानात पडला तर दुसरा तुकडा महाविकास आघाडीचा आधारवड बनला, आता, त्यातील सत्तेचा मघ चाटणाऱ्या अजितदादा पवार यांच्या गटाला लोकसभा निवडणुकीत रायगडचा गड राखता आला. बाकी ठिकाणी केवळ फुल्या अन् फुल्याच..!

### काठावर पास झाल्याची अवस्था..

विधानसभा निवडणुकीत आमदारांची संख्या चाळीसच्या घरात..याचा अर्थ काठावर पास झाल्यासारखी गाठता आली, ती सुद्धा भाजपा आणि राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या मदतीने ! अन्यथा, तिथेच पक्षाचा पुरता बोऱ्या वाजला असता. मिटकरी हे अजित पवार यांना जरी विटकरी वाटत नसले, तरी आम जनतेला त्यांचा जाम वीट आला आहे, हे अजित पवार यांनी लक्षात घ्यावे. नको ती बाष्कळ आणि तितकीच वायफळ बडबड करण्यात मिटकरी यांचा हात कोणीही धरू शकत नाही, अजितदादा यांना सर्व अवगत असताना चाळीस आमदारांचं गाठोडं बांधून कधीच ते आपल्या काकांची बरोबरी करणार नाहीत. कारण, काकांनी असा प्रयोग सत्तेचाळीस वर्षांपूर्वी पुलोदच सरकार स्थापन करताना केला होता. असं राजकीय गणित असताना अमोल मिटकरी यांना अजितदादांनी पुढच्याच वर्षी आषाढी एकादशीला पंढरपूरला जाऊन पांडुरंगाची सपत्नीक पूजा करावी, असा आदळ कमी आपटीबार जास्त असणारी वेडसर भावना व्यक्त केली आहे.

### वीट आलेल्या आमदाराची भावना..

आता या वीट आलेल्या आमदारांची भावना पांडुरंगाने एका कानाने ऐकली अन् लगोलग दुसऱ्या कानाने सोडून सुध्दा दिली. कारण पांडुरंगाच्या मते अजितदादांनी मंत्रालयात दिलेल्या उपमुख्यमंत्रीपदाच्या एका विटेवरच पुढील चार वर्षे स्थितप्रज्ञ उभे राहिले तरी खूप काही आहे. त्यामुळे तर शिल्लक राष्ट्रवादी काँग्रेसच्या खासदार सुप्रिया सुळे यांनी या वीट आलेल्या आमदाराला महाराष्ट्राचे शिल्पकार वंदनीय यशवंतराव चव्हाण यांच्या विचारांचा प्रभाव असणारा, याचा अर्थ सिंचन घोटाळ्यात न अडकलेला किंवा शिखर बँक प्रकरणात न गुंतलेला, मुख्यमंत्री महाराष्ट्राला हवा, असा शालजोडा मारला आहे. एकूणच राऊत किंवा मिटकरी यांना पांडुरंगाने विटेवर उभे असताना बुद्धी द्यावी. कारण, त्यांची ही विठ्ठलाच्या कानात केलेली बडबड एकूण कमरेवरचे हात कानावर ठेवायची वेळ पांडुरंगावर येईल, असे वाटते.

### प्रवक्त्यांना कोणीतरी आवरा..

सर्वच पक्षांनी नेमलेले प्रवक्ते अतिशय खालच्या दर्जाचे उद्गार काढतात, त्यात आता भर पडली आहे मनसेचे प्रवक्ते संदीप देशपांडे यांची ! त्यांनी तर विधिमंडळ सदस्यांना षंढ म्हणून हिणवले आहे ! अशा सर्वच प्रवक्त्यांना आवरण्याची गरज असून त्यांना पक्ष नेतृत्वाने लगाम घातला तर महाराष्ट्रातील निम्मे राजकारण योग्य दिशेने जाईल, हे नक्की !

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक-संपादक श्री. अधिकराव दिवे- पाटील** यांनी छत्रपती शिवाजी महाराज गोल मंडई, गाळा क्र. ७९/८०, संत तुकारामनगर, पिंपरी, पुणे- 411018 येथे पुणे विभागीय कार्यालयामधून प्रसिद्ध केले आहे. एमएसएमई नोंदणी क्रमांक : MH-26-0158827. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक-संपादक सहमत असतीलच असे नाही.
**कार्यकारी संपादक : वैष्णव जाधव । मुख्य कार्यकारी संपादक : सुनील आढाव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) विशेष सूचना: हा अंक कोणत्याची प्रकारच्या प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.

# आझमींच्या मनात वारकऱ्यांप्रति कटुता!

## आझमींच्या विधानाचा वारकरी संघ व भाजपकडून निषेध

।मुंबई।
प्रतिनिधी : महाईन्यूज ।

**आमदार अबू आझमी यांचे वक्तव्य दुर्दैवी आहे. त्यांच्या मनात वारकऱ्यांविषयी कटुता आहे, हे सिद्ध झाले. वारी आणि नमाज यातील मूलभूत फरक एका विधानसभा सदस्याला समजायला हवा, अशी टीका वारकरी पाईक संघाचे रामकृष्ण महाराज वीर यांनी केली आहे. तर, आम्ही मुस्लिम समाजाच्या हज यात्रा किंवा अन्य विषयांत टिप्पणी करत नाही. त्यांनीदेखील हिंदूंबाबत करू नये अन्यथा जशास तसे उत्तर देऊ, असे आव्हान भाजप महिला मोर्चाच्या जिल्हाध्यक्ष डॉ. प्राजक्ता बेणारे यांनी दिले.**



अबू आझमी यांच्या वक्तव्याचे पडसाद पंढरपुरात उमटले.आझमी यांनी पालखी सोहळ्यामुळे रस्ता जाम होतो, या वक्तव्याचा सर्वत्र निषेध होत आहे. येथील हिंदुत्ववादी संघटनेने त्यांचा निषेध करून त्यांच्या विरोधात घोषणाबाजी केली. या वेळी वारकरी पाईक संघाचे राष्ट्रीय कार्यकारी सदस्य रामकृष्ण वीर महाराज यांनी आमदार आझमी यांचं वक्तव्य दुर्दैवी आहे. यातूनच वारकऱ्यांविषयी यांच्या मनात कटुता आहे हे सिद्ध होते. त्यांचा पालखी सोहळा आणि नमाज या दोन्ही गोष्टींचा रस्ता जाम होण्याशी संबंध जोडणे हास्यास्पद आहे. कारण सर्व कायदेशीर नियम पाळत वारकरी पंढरपूरला चालत जातात. त्यांचा मार्गच तो आहे. म्हणून गर्दीमुळे काही वेळा आपोआप रस्ता जाम 'होतो', तर दुसरीकडे 'नमाजासाठी अनेक खुली ठिकाणे असतानाही बेकायदापणे 'जाणीवपूर्वक रस्त्यावरच ठाण मांडल्याने रस्ता जाम' केला जातो. हा मूलभूत फरक एका विधानसभा सदस्याला कळायला हवा!' अशी टीका वीर महाराज यांनी केली.'आझमी या व्यक्तिला प्रसिद्धीचा हव्यास आहे. मुळात पालखी सोहळा हा वर्षातून एकदा असतो. आणि तो मार्गक्रमण करत असतो. मात्र, नमाज एका जागेवर बसून पढला जातो. मुळात कोणताही हिंदू समाज कधीही मुस्लिम समाजाच्या हज यात्रा किंवा अन्य विषयावर टीका-टिप्पणी करीत नाही. हिंदू नेहमी सहिष्णुता दाखवतात. मात्र, या आझमीला या गोष्टीचा विसर पडला आहे. त्यांनी माफी मागावी अन्यथा जशास तसे उत्तर देऊ', असा इशारा भाजप महिला मोर्चाच्या जिल्हाध्यक्ष डॉ. प्राजक्ता बेणारे यांनी दिला.अबू आझमी यांच्या वक्तव्याचे पडसाद पंढरपुरात उमटले.आझमी यांनी पालखी सोहळ्यामुळे रस्ता जाम होतो, या वक्तव्याचा सर्वत्र निषेध होत आहे. येथील हिंदुत्ववादी संघटनेने त्यांचा निषेध करून त्यांच्या विरोधात घोषणाबाजी केली. या वेळी वारकरी पाईक संघाचे राष्ट्रीय कार्यकारी सदस्य रामकृष्ण वीर महाराज यांनी आमदार आझमी यांचं वक्तव्य दुर्दैवी आहे. यातूनच वारकऱ्यांविषयी यांच्या मनात कटुता आहे हे सिद्ध होते. त्यांचा पालखी सोहळा आणि नमाज या दोन्ही गोष्टींचा रस्ता जाम होण्याशी संबंध जोडणे हास्यास्पद आहे. कारण सर्व कायदेशीर नियम पाळत वारकरी पंढरपूरला चालत जातात. त्यांचा मार्गच तो आहे. म्हणून गर्दीमुळे काही वेळा आपोआप रस्ता जाम 'होतो', तर दुसरीकडे 'नमाजासाठी अनेक खुली ठिकाणे असतानाही बेकायदापणे 'जाणीवपूर्वक रस्त्यावरच ठाण मांडल्याने रस्ता जाम' केला जातो. हा मूलभूत फरक एका विधानसभा सदस्याला कळायला हवा!' अशी टीका वीर महाराज यांनी केली.'आझमी या व्यक्तिला प्रसिद्धीचा हव्यास आहे. मुळात पालखी सोहळा हा वर्षातून एकदा असतो. आणि तो मार्गक्रमण करत असतो.

### हिंदू नेहमी सहिष्णुता दाखवतात

मात्र, नमाज एका जागेवर बसून पढला जातो. मुळात कोणताही हिंदू समाज कधीही मुस्लिम समाजाच्या हज यात्रा किंवा अन्य विषयावर टीका-टिप्पणी करीत नाही. हिंदू नेहमी सहिष्णुता दाखवतात. मात्र, या आझमीला या गोष्टीचा विसर पडला आहे. त्यांनी माफी मागावी अन्यथा जशास तसे उत्तर देऊ', असा इशारा भाजप महिला मोर्चाच्या जिल्हाध्यक्ष डॉ. प्राजक्ता बेणारे यांनी दिला.आमदार अबू आझमी यांचे वक्तव्य दुर्दैवी आहे. त्यांच्या मनात वारकऱ्यांविषयी कटुता आहे, हे सिद्ध झाले. वारी आणि नमाज यातील मूलभूत फरक एका विधानसभा सदस्याला समजायला हवा, अशी टीका वारकरी पाईक संघाचे रामकृष्ण महाराज वीर यांनी केली आहे. तर, आम्ही मुस्लिम समाजाच्या हज यात्रा किंवा अन्य विषयांत टिप्पणी करत नाही.

# कोयना धरणातील जलआवक 'जैसे थे'

## साताऱ्यातील प्रमुख सहा धरणांत 40 टक्के जलसाठा

।मुंबई।
प्रतिनिधी : महाईन्यूज ।

**कोयना धरण पाणलोटात दमदार पाऊस आणि धरणातील जलआवक 'जैसे थे' असून, पश्चिम घाटक्षेत्रात पावसाच्या हलक्या सरी कोसळणे सुरूच आहे. वीज, सिंचन, पाणी पुरवठ्यासाठी महत्त्वाचा असलेला कोयना शिवसागराचा जलसाठा ३८.३३ अब्ज घनफूट (३६.४२ टक्के) झाला आहे. तर, सातारा जिल्ह्यातील प्रमुख सहा धरणांचा जलसाठा ४० टक्क्यांच्या घरात पोहचला आहे.**



कोयना धरणाचा अपवादवगळता अन्य जलाशय क्षेत्रात ढगाळ वातावरणात तुरळक पाऊस कोसळत आहे. अशीच स्थिती अन्य विभागांतही दिसत आहे. दरम्यान, छोटी धरणे, तलाव, बंधारे भरून वाहत आहेत. तर, मोठ्या धरणांचा जलसाठा समाधानकारक स्थितीत राहिला आहे. सातारा जिल्ह्यातील कोयना, धोम, कण्हेर, धोम- बलकवडी, उरमोडी आणि तारळी या प्रमुख धरणांची साठवणक्षमता १४८.७४ अब्ज घनफूट असून, आजमितीला या धरणांमध्ये ५९.०८ अब्ज घनफूट (३९.७२ टक्के) जलसाठा झाला आहे.कोयना शिवसागरात सोमवारी (दि. २३) सकाळी आठ ते सायंकाळी पाच वाजेपर्यंत १.४३ अब्ज घनफूट पाण्याची आवक होऊन सकल जलसाठा ३८.३३ अब्ज घनफूट (३६.४२ टक्के) झाला आहे. कोयना धरणात प्रतिसेकंद १६,५५३ घनफूट (क्युसेक) पाण्याची आवक होत आहे. कोयना पाणलोटात दिवसभरात सरासरी ३६.३३ मिमी पाऊस झाला आहे. त्यात कोयनानगरला ४० मिमी (एकूण ९११), नवजाला ३३ मिमी (एकूण ९१२), महाबळेश्वरला ३६ मिमी (एकूण ८७६) पावसाची नोंद राहिली आहे. सोमवारी दिवसभरात पश्चिम घाटात तांदुळवाडी (ता. पन्हाळा, जि. कोल्हापूर) येथे सर्वाधिक ४६ मिमी पाऊस झाला आहे२३ मिमी असा जोरदार पाऊस झाला आहे.दुसरीकडे खरीप पेऱ्याला सुरुवात होण्यासाठी जमिनीतील पाणी आणि अतिरिक्त ओलावा कमी व्हावा म्हणून पावसाची विश्रांती व भरपूर सूर्यप्रकाश मिळणे आवश्यक आहे. त्यासाठी बळीराजासह सामान्य जनतेचे आभाळाकडे लक्ष लागून राहिले आहे.

### जनतेचे आभाळाकडे लक्ष लागून

छोटी धरणे, तलाव, बंधारे भरून वाहत आहेत. तर, मोठ्या धरणांचा जलसाठा समाधानकारक स्थितीत राहिला आहे. सातारा जिल्ह्यातील कोयना, धोम, कण्हेर, धोम- बलकवडी, उरमोडी आणि तारळी या प्रमुख धरणांची साठवणक्षमता १४८.७४ अब्ज घनफूट असून, आजमितीला या धरणांमध्ये ५९.०८ अब्ज घनफूट (३९.७२ टक्के) जलसाठा झाला आहे.कोयना शिवसागरात सोमवारी (दि. २३) सकाळी आठ ते सायंकाळी पाच वाजेपर्यंत १.४३ अब्ज घनफूट पाण्याची आवक होऊन सकल जलसाठा ३८.३३ अब्ज घनफूट (३६.४२ टक्के) झाला आहे. कोयना धरणात प्रतिसेकंद १६,५५३ घनफूट (क्युसेक) पाण्याची आवक होत आहे.त्यात कोयनानगरला ४० मिमी व्हावा म्हणून पावसाची विश्रांती व भरपूर सूर्यप्रकाश मिळणे आवश्यक आहे. त्यासाठी बळीराजासह सामान्य जनतेचे आभाळाकडे लक्ष लागून राहिले आहे.

# लढण्याची क्षमता केवळ ‘आप’मध्येच!

## निकालानंतर केजरीवाल यांची काँग्रेसवर टीका

। नवी दिल्ली । प्रतिनिधी : महाईन्यूज ।

**भाजपविरोधात लढण्याची क्षमता काँग्रेसमध्ये नसून केवळ ‘आप’मध्ये आहे असा दावा ‘आप’चे सर्वेसर्वा अरविंद केजरीवाल यांनी सोमवारी केला. इतकेच नाही तर गुजरातमध्ये काँग्रेस ही भाजपची ‘बी टीम’ आहे अशी टीकाही त्यांनी केली. दिल्ली विधानसभा निवडणुकीतील पराभवानंतर सोमवारी केजरीवाल यांनी चार महिन्यांनंतर पहिल्यांदाच पत्रकार परिषद घेतली. यावेळी त्यांनी राज्यसभेचे सदस्य होऊन राष्ट्रीय राजकारणात सक्रिय होण्याची शक्यता फेटाळली.**



“मी राज्यसभेवर जाणार नाही. पक्षातून अन्य कोणाला उमेदवारी द्यायची हे पक्षाचे पॉलिटब्युरोचे सदस्य ठरवतील,” असे त्यांनी स्पष्ट केले. पाच विधानसभा मतदारसंघांतील पोटनिवडणुकीपैकी तीन मतदारसंघांमध्ये ‘आप’ने उमेदवार उभे केले होते. त्यापैकी २ जागा त्यांनी मोठ्या मताधिक्याने जिंकल्या. या विजयामुळे ‘आप’ आणि केजरीवाल पुन्हा राष्ट्रीय राजकारणामध्ये सक्रिय होतील असे मानले जात आहे. गुजरातमध्ये सत्ता भाजपची असून प्रशासन त्यांच्या ताब्यात आहे. तरीही विसावदर मतदारसंघामध्ये ‘आप’ने भाजपचा पराभव केला. हे पाहिले तर गुजरातमधील लोक भाजपला किती कंटाळले आहेत हे स्पष्ट होते, असे केजरीवाल म्हणाले. पंजाबमधील लुधियाना-पश्चिम मतदारसंघातून ‘आप’चे संजीव अरोरो विजयी झाल्याने राज्यसभेतील एक जागा रिक्त होत आहे. या जागेसाठी ‘आप’कडून अरविंद केजरीवाल यांना उमेदवारी दिली जाईल असे मानले जात होते. मात्र, राज्यसभेचे सदस्य होण्याची शक्यता केजरीवाल यांनी फेटाळून लावली. त्यामुळे मनीष सिसोदिया वा अन्य कोणत्या नेत्याला उमेदवारी दिली जाईल याबाबत उत्सुकता निर्माण झाली आहे. दिल्ली विधानसभा निवडणुकीत केजरीवाल व सिसोदिया या दोघांचाही पराभव झाला होता. या पोटनिवडणुकांवरून हे दिसते की काँग्रेसच्या नेतृत्वाने कशा प्रकारे ‘आप’चा पराभव करण्यासाठी भाजपला मदत केली. काँग्रेस भाजपची कठपुतळी झाली आहे. काँग्रेसच्या कार्यकर्त्यांनी हे लक्षात घ्यावे आणि ‘आप’मध्ये प्रवेश करावा अशी मी विनंती करतो. केजरीवाल यावेळी म्हणाले की, “मी राज्यसभेवर जाणार नाही. पक्षातून अन्य कोणाला उमेदवारी द्यायची हे पक्षाचे पॉलिटब्युरोचे सदस्य ठरवतील,” असे त्यांनी स्पष्ट केले. पाच विधानसभा मतदारसंघांतील पोटनिवडणुकीपैकी तीन

मतदारसंघांमध्ये ‘आप’ने उमेदवार उभे केले होते. त्यापैकी २ जागा त्यांनी मोठ्या मताधिक्याने जिंकल्या. या विजयामुळे ‘आप’ आणि केजरीवाल पुन्हा राष्ट्रीय राजकारणामध्ये सक्रिय होतील असे मानले जात आहे. गुजरातमध्ये सत्ता भाजपची असून प्रशासन त्यांच्या ताब्यात आहे. तरीही विसावदर मतदारसंघामध्ये ‘आप’ने भाजपचा पराभव केला. हे पाहिले तर गुजरातमधील लोक भाजपला किती कंटाळले आहेत हे स्पष्ट होते, असे केजरीवाल म्हणाले. पंजाबमधील लुधियाना-पश्चिम मतदारसंघातून ‘आप’चे संजीव अरोरो विजयी झाल्याने राज्यसभेतील एक जागा रिक्त होत आहे. या जागेसाठी ‘आप’कडून अरविंद केजरीवाल यांना उमेदवारी दिली जाईल असे मानले जात होते. मात्र, राज्यसभेचे सदस्य होण्याची शक्यता केजरीवाल यांनी फेटाळून लावली. त्यामुळे मनीष सिसोदिया वा अन्य कोणत्या नेत्याला उमेदवारी दिली जाईल याबाबत उत्सुकता निर्माण झाली आहे. दिल्ली विधानसभा निवडणुकीत केजरीवाल व सिसोदिया या दोघांचाही पराभव झाला होता.

### काँग्रेस ही भाजपची ‘बी टीम’ आहे

या पोटनिवडणुकांवरून हे दिसते की काँग्रेसच्या नेतृत्वाने कशा प्रकारे ‘आप’चा पराभव करण्यासाठी भाजपला मदत केली. काँग्रेस भाजपची कठपुतळी झाली आहे. काँग्रेसच्या कार्यकर्त्यांनी हे लक्षात घ्यावे आणि ‘आप’मध्ये प्रवेश करावा अशी मी विनंती करतो.भाजपविरोधात लढण्याची क्षमता काँग्रेसमध्ये नसून केवळ ‘आप’मध्ये आहे असा दावा ‘आप’चे सर्वेसर्वा अरविंद केजरीवाल यांनी सोमवारी केला. इतकेच नाही तर गुजरातमध्ये काँग्रेस ही भाजपची ‘बी टीम’ आहे अशी टीकाही त्यांनी केली. दिल्ली विधानसभा निवडणुकीतील पराभवानंतर सोमवारी केजरीवाल यांनी चार महिन्यांनंतर पहिल्यांदाच पत्रकार परिषद घेतली.

# ‘तू माझ्यापेक्षा तरुण दिसतोस’

## इस्कॉनच्या साधूंनी सांगितला पिचाईंच्या भेटीचा मनोरंजक किस्सा

। नवी दिल्ली । प्रतिनिधी : महाईन्यूज ।

**इस्कॉनचे साधू गौरांग दास यांनी गुगलचे सीईओ सुंदर पिचाई यांच्या भेटीचा एक मनोरंजक किस्सा लंडनमधील एका कार्यक्रमात बोलताना सांगितला आहे. गौरांग दास यांनी इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी (आयआयटी) बॉम्बे येथून बीटेक पदवी घेतलेली आहे. मात्र, असं असलं तरी देखील गौरांग दास यांनी अध्यात्माचा स्वीकार करण्याचा निर्णय घेत ते इस्कॉनचे साधू बनले आहेत.**





गौरांग दास यांनी इंडिया ग्लोबल फोरम २०२५ या कार्यक्रमात बोलताना सांगितलं की गुगलचे सीईओ सुंदर पिचाई हे त्यांच्याच वयाचे आहेत. सुंदर पिचाई यांनी गौरांग दास यांच्या तरुण दिसण्यावरून त्यांचं कौतुक केल्याचं गौरांग दास यांनी सांगितलं आहे. तसेच माणसांमध्ये तणाव आणि एकाकीपणाची भावना वाढण्यामागची कारणंही त्यांनी सांगितली. या संदर्भातील वृत्त हिंदुस्तान टाईम्सने दिलं आहे. गौरांग दास यांनी डिजिटल व्यसन, एकटेपणा आणि चिंता आणि सोशल मीडियासंदर्भात देखील भाष्य केलं. ते म्हणाले की, “आपल्यासमोर एक मोठी समस्या आहे. जगभरात २३ कोटी लोकांना सोशल मीडियाचं व्यसन आहे. एकट्या भारतात ७० टक्के किशोरवयीन मुलं दररोज सात तास ऑनलाईन वेळ घालवतात. जगभरातील सातपैकी एक व्यक्ती मानसिक आरोग्याच्या समस्यांनी ग्रस्त आहे”, असंही गौरांग दास यांनी म्हटलं आहे.गौरांग दास ज्यांना गौरांग प्रभू (एएसके आनंद) म्हणून देखील ओळखलं जातं.गौरांग दास यांनी लंडनमध्ये बोलताना खुलासा केला की त्यांनी पदवीचं शिक्षण घेतल्यानंतर ते जेव्हा सुंदर पिचाई यांना भेटले तेव्हा त्यांनी गौरांग दास यांच्या लूकचं कौतुक केलं होतं. गौरांग दास म्हणाले की, “मी सुंदर पिचाई यांच्याच बॅचमध्ये आयआयटीमध्ये गेलो होतो. काही वर्षांनंतर आम्ही भेटलो.

### गौरांग दास कोण आहेत?

दरम्यान, यावेळी गौरांग दास यांनी डिजिटल व्यसन, एकटेपणा आणि चिंता आणि सोशल मीडियासंदर्भात देखील भाष्य केलं. ते म्हणाले की, “आपल्यासमोर एक मोठी समस्या आहे. जगभरात २३ कोटी लोकांना सोशल मीडियाचं व्यसन आहे. एकट्या भारतात ७० टक्के किशोरवयीन मुलं दररोज सात तास ऑनलाईन वेळ घालवतात. जगभरातील सातपैकी एक व्यक्ती मानसिक आरोग्याच्या समस्यांनी ग्रस्त आहे”, असंही गौरांग दास यांनी म्हटलं आहे.गौरांग दास ज्यांना गौरांग प्रभू (एएसके आनंद) म्हणून देखील ओळखलं जातं. ते एक इस्कॉनमध्ये (इंटरनॅशनल सोसायटीमध्ये फॉर कृष्णा कॉन्शियसनेस) साधू आहेत. दास यांनी स्वतःला आध्यात्मिक आणि सामाजिक कार्यात पूर्णपणे समर्पित करण्याचा निर्णय घेतला आहे. त्यांचे काही पुस्तक देखील प्रकाशित झालेले आहेत.

# मला ओळखत नाहीत त्यांनी शांत राहावे



गेल्या काही दिवसांपासून श्रुती हासनने तिचा बॉयफ्रेंड शंतनू हजारिकासोबत लग्न केल्याची अफवा पसरली होती. आता लग्नाच्या सततच्या बातम्यांदरम्यान, श्रुती आणि तिच्या प्रियकराने स्पष्टीकरण दिले आहे आणि अफवा पसरवणाऱ्यांना विशेष विनंती केली आहे. मंगळवारी संध्याकाळी लग्नाची बातमी आल्यानंतर श्रुती हासनने सोशल मीडियावर स्पष्टीकरण दिले आहे. तिने इंस्टाग्राम स्टोरीवर लिहिले आहे, माझे लग्न झालेले नाही. आयुष्याच्या प्रत्येक बाबतीत अगदी मोकळेपणाने बोलणारी माझ्यासारखी व्यक्ती लग्नाची गोष्ट का लपवेल? जे मला अजिबात ओळखत नाहीत त्यांनी शांत राहावे. श्रुतीचा प्रियकर शंतनू हजारिका याने सोशल मीडियावर लिहिले आहे, तुम्ही सर्वांनी शांत राहण्याची गरज आहे. आमचे लग्न झालेले नाही. जे लोक आम्हाला ओळखत नाहीत त्यांनी कृपया अफवा पसरवू नये. अलीकडेच ओरी ऊर्फ ओरहान अवतारमणीचे इंस्टाग्रामवर आस्क मी एनीथिंग सेशन होते. यादरम्यान एका चाहत्याने त्याला विचारले की, असा कोणी सेलिब्रिटी आहे का ज्याने तुमच्यासोबत फोटो क्लिक करण्यास नकार दिला आहे आणि उद्धटपणा दाखवला आहे. नाव घेता येत नसेल तर हिंट द्या. याला उत्तर देताना ओरीने श्रुती हासनचे नाव घेतले. तो म्हणाला, मी कधीच तिच्यासोबत फोटो क्लिक करायला सांगितले नाही, आम्ही एका कार्यक्रमात भेटलो, जिथे ती माझ्यासोबत खूप उद्धटपणे वागत होती. मी तिला ओळखतही नाही. मला खूप वाईट वाटलं. मला वाटतं काही गैरसमज झाला असावा कारण मी तिच्या पतीला चांगले ओळखतो आणि त्याला पसंत करतो. आमचा गैरसमज ताबडतोब दूर झाला, पण नंतर मला कळले की तिने मला प्यून किंवा स्पॉटबॉय म्हटले होते. ओरीने शंतनू हजारिकाला श्रुती हासनचा प्रियकर नव्हे तर नवरा म्हणून संबोधताच त्यांच्या लग्नाच्या बातम्या सुरू झाल्या. कारण ओरीने तो शंतनूचा मित्र असल्याचंही म्हटलं आहे. श्रुती हासन गेल्या ३-४ वर्षांपासून शंतनूसोबत रिलेशनशिपमध्ये आहे. शंतनू हा कलाकार आहे. आजकाल श्रुती हासन प्रभाससोबत सालार पार्ट-१: सीझफायर या चित्रपटात दिसत आहे. याशिवाय अभिनेत्री द आय आणि डकोइटमध्ये दिसणार आहे. हे दोन्ही चित्रपट 2024 मध्ये प्रदर्शित होणार आहेत.

## सलमानच्या बहुचर्चित 'सिकंदर'चा टीझर

अभिनेता सलमान खानच्या आगामी 'सिकंदर' या सिनेमाची त्याच्या चाहत्यांमध्ये खूप उत्सुकता आहे. चाहत्यांच्या लाडक्या भाईजानचा २०२४ मध्ये एकही सिनेमा प्रदर्शित झाला नाही. यामुळे सलमानचे चाहते या सिनेमाची आतुरतेने वाट पाहत आहेत. या सिनेमाचा टीझर सलमानच्या वाढदिवशी म्हणजेच २७ डिसेंबर २०२४ ला प्रदर्शित होणार होता. पण माजी पंतप्रधान डॉ. मनमोहन सिंग यांच्या निधनामुळे याचे प्रदर्शन पुढे गेले होते. आता सलमानचा 'सिकंदर' सिनेमाचा टीझर प्रेक्षकांच्या भेटीला आला आहे. 'सिकंदर'च्या टीझरच्या सुरुवातीला सलमान पाठमोरा दाखवला आहे. यात सलमान एका गूढ ठिकाणावरुन चालत चालत पुढे जाताना दाखवला आहे.

## पाळीतील त्रास ही समस्या



अभिनेता गोविंदा आणि सुनीता आहुजा यांची मुलगी टीना आहुजाने मासिक पाळीबद्दल वक्तव्य केलं आहे. तिच्या या वक्तव्याची सध्या खूप चर्चा होत आहे. टीनाने तिच्या आईबरोबर एक मुलाखत दिली. या मुलाखतीत तिने तिच्या आयुष्यातील विविध गोष्टींबाबत चर्चा केली. यावेळी तिने मासिक पाळीत होणाऱ्या त्रासाबद्दल तिचं मत मांडलं. मासिक पाळीच्या वेदना फक्त मुंबई आणि दिल्ली सारख्या शहरांमधील महिलांना होतात. लहान शहरांमध्ये महिलांना पाळी कधी येते, कधी जाते हेही माहीत नसतं. तसेच पिरियड क्रॅम्प्स हे मानसिक असतात असा दावाही तिने केला. टीना आहुजा म्हणाली, "मी चंदीगडमध्ये जास्त राहते आणि मी फक्त मुंबई आणि दिल्लीतील मुलींना पिरियड क्रॅम्प्सबद्दल बोलताना ऐकलं आहे. निम्म्या अडचणी तर या त्याबद्दल बोलतात, त्यातूनच उद्भवतात. कधीकधी ज्यांना पिरियड क्रॅम्प्स होत नाही, त्यांनाही ते मानसिकदृष्ट्या जाणवू लागतात. पंजाब आणि इतर लहान शहरांतील महिलांना मासिक पाळी कधी येते किंवा रजोनिवृत्ती कधी येते हेही माहीत नसतं. त्यांना पाळी आल्याचं जाणवत नाही."मासिक पाळीदरम्यान महिलांना जो त्रास होतो, त्याला महिलांच्या आहाराच्या सवयींना कारणीभूत असल्याचं मत टीनाने मांडलं. "मला मासिक पाळीत पाठदुखी होत नाही. मला क्रॅम्प्सही येत नाहीत. पण, मी बऱ्याचदा मुलींना त्याबद्दल बोलताना ऐकते. तुम्ही तूप खा, तुमचा

## ईशा कोप्पीकर अन् टीमी नारंग यांचा घटस्फोट!

बॉलीवूडची प्रसिद्ध अभिनेत्री ईशा कोप्पीकर ही आता वेगळ्याच कारणांमुळे चर्चेत आली आहे. तिचा आणि टीमी नारंग यांचा घटस्फोट झाल्याच्या बातम्यांना उधाण आले आहे. १४ वर्षांच्या सहजीवनानंतर त्यांनी वेगळं होण्याचा निर्णय घेतल्याचे सांगण्यात येत आहे. बॉलीवूडची 'खल्लास गर्ल' म्हणून लोकप्रिय झालेल्या ईशा कोप्पीकरच्या या बातमीनं तिच्या चाहत्यांना मोठा धक्का बसला आहे. टीमी आणि ईशा गेल्या १४ वर्षांपासून एकमेकांसोबत होते. त्यांना एक मुलगीही आहे. सुत्रांनी दिलेल्या माहितीनुसार ईशा आणि टीमीनं गेल्या महिन्यातच घटस्फोट घेतला आहे. यासंबंधीची अधिक माहिती टाईम्स ऑफ इंडियानं देखील दिली आहे. मिळालेल्या माहितीनुसार ईशा ही तिच्या ९ वर्षांच्या मुलीसह टीमीचं घर सोडून दुसरीकडे राहण्यास गेली आहे. यापूर्वी ज्या काही बातम्या समोर आल्या होत्या त्यातून दोघांनी देखील हे नातं जपण्यासाठी आटोकाट प्रयत्न केला मात्र त्यांच्यातील विसंवादामुळे ते नातं फार काळ टिकू शकलं नाही. त्यामुळे त्यांनी अखेर विभक्त होण्याचा निर्णय घेतला. ईशा आणि टीमीच्या लवस्टोरीविषयी सांगायचे झाल्यास त्यांनी एकमेकांना तीन वर्षांपर्यंत डेट केले होते. त्यानंतर २००९ मध्ये त्यांनी लग्न केले. ईशानं बॉलीवूड सोडून बिझनेसमध्ये करिअर करण्याचा निर्णय घेतला होता. तिच्या बॉलीवूड प्रोजेक्टविषयी सांगायचे झाल्यास, ईशा शेवटी अलयान नावाच्या तमिळ चित्रपटामध्ये दिसली होती. त्यापूर्वी तिनं लव यू लोकतंत्र, अस्सी नब्बे पुरे सौ, कवचा सारख्या चित्रपटांमध्ये देखील काम केले होते. तिच्या बच के रहना तू बच के रहना, खल्लास... नावाच्या गाण्यावर केलेला डान्स लोकप्रिय झाला होता. बॉलीवूडची 'खल्लास गर्ल' म्हणून लोकप्रिय झालेल्या ईशाच्या या बातमीनं तिच्या चाहत्यांना मोठा धक्का बसला आहे.

## प्रसिद्ध अभिनेत्री हिना खान रुग्णालयात



टीव्ही मनोरंजन आणि चित्रपट विश्वातील प्रसिद्ध अभिनेत्री हिना खान हिच्या चाहत्यांसाठी एक धक्कादायक बातमी समोर आली आहे. ती म्हणजे तिला तातडीनं रुग्णालयात दाखल करण्यात आली आहे. या घटनेनंतर चाहत्यांनी काळजी व्यक्त केली आहे. हिनानं आपल्या प्रकृतीबाबत सोशल मीडियावर पोस्ट शेयर करुन याबाबत माहिती दिली आहे. तिला मुंबईतील एका रुग्णालयात दाखल करण्यात आल्याचे सांगण्यात आले आहे. हिनाला ताप आल्यानं तिला ॲडमिट करण्यात आल्याची माहिती सुत्रांनी दिली आहे.त्या फोटोंवर चाहत्यांनी कमेंट करत हिनाला काळजी घेण्यास सांगितले आहे. हिनानं तिच्या इंस्टा अकाउंटवरुन शेयर केलेला फोटो चाहत्यांच्या प्रतिक्रियांचा विषय आहे. हिनाला १०२ एवढा ताप असल्याचे तिनं म्हटले आहे. गेल्या चार रात्री मी काही झोपलेले नाही. मी तापानं खूप बेजार आहे. ताप काही कमी होण्याचे नाव घ्यायला तयार नाही. अशातच मला रुग्णालयात दाखल व्हावे लागले आहे. खूपच अशक्तपणा आला आहे. असेही हिनानं म्हटले आहे. हिनाच्या प्रोजेक्टविषयी पाहायचे झाल्यास तिचा कंट्री ऑफ ब्लाईंड नावाचा चित्रपट ऑस्करसाठी नॉमिनेट झाल्याचे बोलले जात आहे. त्यात तिनं केलेली भूमिका चाहत्यांच्या कौतुकाचा विषय आहे. या चित्रपटामध्ये अनुष्का सेन, शोएब निकाश शहा, नमिता लाल, इनाम उल हक, प्रद्युम्न सिंग मॉल आणि जितेंद्र राय यांच्या महत्वाच्या भूमिका आहेत.

# राहुलच्या शतकावर अथियाची पोस्ट!

## लाडक्या लेकीच्या जन्मानंतर पहिलं कसोटी शतक





।मुंबई।
प्रतिनिधी : महाईन्यूज ।

**भारतीय संघाच्या फलंदाजांनी पहिल्या कसोटीत दोन्ही डावांमध्ये चांगली फलंदाजी करत इंग्लंड संघाला मोठ्या धावसंख्येचं आव्हान दिलं आहे. पहिल्या कसोटीत भारताच्या ५ खेळाडूंनी शतक झळकावलं आहे. यासह भारताने इंग्लंडला विजयासाठी ३७१ धावांचं मोठं आव्हान दिलं आहे. दुसऱ्या डावात केएल राहुलने कमालीची फलंदाजी करत शतक झळकावत संघाचा डाव सावरला आहे. या शतकानंतर केएल राहुलच्या पत्नीने त्याच्यासाठी खास पोस्ट शेअर केली आहे.**

दुसऱ्या डावात भारताची सुरूवात फारशी चांगली झाली नाही. भारताने लवकर ३ विकेट्स गमावले होते. पण सलामीला आलेल्या राहुलने संघाचा डाव एका टोकाकडून सावरला. यानंतर ऋषभ पंत आणि केएल राहुलने मोठी भागीदारी रचत भारतीय संघाला ३०० धावांच्या आघाडीपर्यंत पोहोचवले. चौथ्या दिवसाचं पहिलं सत्र फलंदाजीसाठी खूप अवघड होतं. पण पंत आणि राहुलने काळजीपूर्वक फलंदाजी करत विकेट्स राखून ठेवले. राहुल-पंतने त्यानंतर दुसऱ्या सत्रात आक्रमक फटके खेळत आपली अर्धशतक झळकावली. केएल राहुलने पहिल्या डावातही चांगली फलंदाजी केली होती, पण अर्धशतक झळकावण्यात अपयशी ठरला. पण या डावात तो शतक पूर्ण करूनच माघारी परतला. राहुल २४७ चेंडूत १८ चौकारांसह १३७ धावांची शानदार खेळी करत माघारी परतला. त्याला ब्रायडन कार्सने बोल्ड करत बाद केलं.केएल राहुलच्या या शतकानंतर त्याची पत्नी अथिया शेट्टी हिने त्याच्यासाठी इन्स्टाग्राम स्टोरी शेअर केली आहे. अथियाने राहुलसाठी एक स्पेशल मेसेजही स्टोरीमध्ये लिहिला. तिने राहुलचा मैदानातील फोटो शेअर करत ही खेळी खूप खास होती, असं कॅप्शन लिहिलं आहे आणि पुढे हार्ट इमोजीदेखील टाकला आहे. केएल राहुल आणि आथिया शेट्टी नुकतेच एका गोंडस मुलीचे आई-बाबा झाले आहेत. इवारा असं त्यांनी आपल्या लेकीचं नाव ठेवलं आहे. लेकीच्या जन्मानंतर राहुलचं हे पहिलं आंतरराष्ट्रीय शतक होतं. राहुल एक चांगला फलंदाज असला तरी त्याला भारताच्या कसोटी संघात स्थान मिळवण्यासाठी नेहमीच संघर्ष करावा लागला. रोहित शर्माच्या कसोटीतून निवृत्तीमुळे तो संघाचा सलामीवीर म्हणून त्याच्या आवडत्या जागी परतला आहे. राहुलचा हॅरी ब्रुकने एक झेल सोडला आणि त्याला एक जीवदान मिळालं, पण त्याशिवाय संपूर्ण सामन्यात तो सहज फलंदाजी करत धावा काढताना दिसला. या खेळीसह, राहुलने गावस्कर आणि द्रविडला मागे टाकलं आहे आणि इंग्लंडमध्ये सर्वाधिक शतकं करणारा भारतीय सलामीवीर फलंदाज बनला.दुसऱ्या डावात भारताची सुरूवात फारशी चांगली झाली नाही. भारताने लवकर ३ विकेट्स गमावले होते. पण सलामीला आलेल्या राहुलने संघाचा डाव एका टोकाकडून सावरला. यानंतर ऋषभ पंत आणि केएल राहुलने मोठी भागीदारी रचत भारतीय संघाला ३०० धावांच्या आघाडीपर्यंत पोहोचवले. चौथ्या दिवसाचं पहिलं सत्र फलंदाजीसाठी खूप अवघड होतं. पण पंत आणि राहुलने काळजीपूर्वक फलंदाजी करत विकेट्स राखून ठेवले. राहुल-पंतने त्यानंतर दुसऱ्या सत्रात आक्रमक फटके खेळत आपली अर्धशतक झळकावली. केएल राहुलने पहिल्या डावातही चांगली फलंदाजी केली होती, पण अर्धशतक झळकावण्यात अपयशी ठरला. पण या डावात तो शतक पूर्ण करूनच माघारी परतला. राहुल २४७ चेंडूत १८ चौकारांसह १३७ धावांची शानदार खेळी करत माघारी परतला.

### संघाला 300 धावापर्यंत पोहोचवले

त्याला ब्रायडन कार्सने बोल्ड करत बाद केलं.केएल राहुलच्या या शतकानंतर त्याची पत्नी अथिया शेट्टी हिने त्याच्यासाठी इन्स्टाग्राम स्टोरी शेअर केली आहे. अथियाने राहुलसाठी एक स्पेशल मेसेजही स्टोरीमध्ये लिहिला. तिने राहुलचा मैदानातील फोटो शेअर करत ही खेळी खूप खास होती, असं कॅप्शन लिहिलं आहे आणि पुढे हार्ट इमोजीदेखील टाकला आहे. केएल राहुल आणि आथिया शेट्टी नुकतेच एका गोंडस मुलीचे आई-बाबा झाले आहेत. इवारा असं त्यांनी आपल्या लेकीचं नाव ठेवलं आहे. लेकीच्या जन्मानंतर राहुलचं हे पहिलं आंतरराष्ट्रीय शतक होतं.राहुल एक चांगला फलंदाज असला तरी त्याला भारताच्या कसोटी संघात स्थान मिळवण्यासाठी नेहमीच संघर्ष करावा लागला. रोहित शर्माच्या कसोटीतून निवृत्तीमुळे तो संघाचा सलामीवीर म्हणून त्याच्या आवडत्या जागी परतला आहे.

# इंडियाच्या युवा खेळाडूंचा दुर्मिळ विक्रम

## भारताच्या 93 वर्षांच्या कसोटी इतिहासात पहिल्यांदाचं घडलं असं



।नवी दिल्ली।
प्रतिनिधी : महाईन्यूज ।

**भारताच्या युवा संघाने इंग्लंड दौऱ्यावर पहिल्याच कसोटीत आपल्या कामगिरीची झलक दाखवली आहे. लीड्समध्ये खेळल्या जाणाऱ्या पहिल्या कसोटी सामन्यात, सलामीवीर यशस्वी जैस्वाल, कर्णधार शुबमन गिल आणि ऋषभ पंत यांच्या शतकांच्या जोरावर टीम इंडियाने पहिल्या डावात ४७१ धावा केल्या. तर दुसऱ्या डावात केएल राहुल आणि ऋषभ पंत यांनी शतकं झळकावलं.**

यासह भारताच्या या नव्या संघाने ९३ वर्षांनी एक मोठी कामगिरी नावे केली आहे.भारताने पहिल्या डावात ४७१ धावा करत इंग्लंडसमोर धावांचा डोंगर उभारला. प्रत्युत्तरात इंग्लंडचा पहिला डाव ४६५ धावांवर सर्वबाद झाला. स्टार वेगवान गोलंदाज जसप्रीत बुमराहने एकट्याने इंग्लंडच्या निम्म्या संघाला पॅव्हेलियनमध्ये धाडलं. त्यानंतर, चौथ्या दिवशी भारताच्या दुसऱ्या डावात २ विक्रमी शतकं पाहायला मिळाली.केएल राहुलने त्याच्या कसोटी कारकिर्दीतील ९वं शतक झळकावलं. केएलने त्याचे शतक पूर्ण केल्यानंतर काही वेळातच, ऋषभ पंतनेही शतक झळकावून इतिहास लिहिला. कसोटी सामन्याच्या दोन्ही डावात शतक झळकावणारा पंत जगातील दुसरा यष्टिरक्षक-फलंदाज बनला आहे.ऋषभ पंतने १३० चेंडूत १२ चौकार आणि २ षटकारांच्या मदतीने त्याच्या कसोटी कारकिर्दीतील ८ वे शतक झळकावले. पंतचे शतक भारतीय कसोटी क्रिकेटच्या ९३ वर्षांच्या इतिहासातील एक मोठा मैलाचा दगड ठरला. पहिल्यांदाच भारताने एका कसोटी सामन्यात ५ शतकं झळकावली आहेत. लीड्स कसोटीपूर्वी, टीम इंडियाच्या फलंदाजांनी एकाच कसोटी सामन्यात ५ शतकं झळकावण्याचा मोठा पराक्रम याआधी कधीच केला नव्हता. याआधी, एका कसोटी सामन्यात भारतीय फलंदाजांनी सर्वाधिक ४ शतकं केली होती. २००७ मध्ये, भारतीय फलंदाजांनी मिरपूरमध्ये बांगलादेशविरुद्ध हा पराक्रम केला होता.पहिल्या डावात यशस्वी जैस्वाल, शुबमन गिल आणि ऋषभ पंत यांनी शतकं झळकावली. यशस्वी जैस्वालने १५९ चेंडूत १६ चौकार आणि एका षटकारासह १०१ धावांची खेळी केली. तर कर्णधार शुबमन गिलने कॅप्टन म्हणून पदार्पणाच्या सामन्यात शतक केले. त्याने २२७ चेंडूत १९ चौकार आणि एका षटकारासह १४७ धावांची सर्वात मोठी खेळी केली. तर ऋषभ पंतने १७८ चेंडूत १२ चौकार आणि ६ षटकारांसह १३४ धावांची वादळी खेळी केली.यासह भारताच्या या नव्या संघाने ९३ वर्षांनी एक मोठी कामगिरी नावे केली आहे. भारताने पहिल्या डावात ४७१ धावा करत इंग्लंडसमोर धावांचा डोंगर उभारला.

### भारताच्या खेळाडूंची 5 शतकं

प्रत्युत्तरात इंग्लंडचा पहिला डाव ४६५ धावांवर सर्वबाद झाला. स्टार वेगवान गोलंदाज जसप्रीत बुमराहने एकट्याने इंग्लंडच्या निम्म्या संघाला पॅव्हेलियनमध्ये धाडलं. त्यानंतर, चौथ्या दिवशी भारताच्या दुसऱ्या डावात २ विक्रमी शतकं पाहायला मिळाली.केएल राहुलने त्याच्या कसोटी कारकिर्दीतील ९वं शतक झळकावलं.

स्मार्ट PCMC SMART CITY
महाईन्यूज ™
ePaper
epaper.mahaenews.com
। मंगळवार।
। दि. 24 जून 2025।
पिंपरी-चिंचवड, मावळ आवृत्ती

# चिंचवड मध्ये विद्यार्थ्यांनी अनुभवली "स्वच्छता वारी"!

## शिक्षण विश्व: चिंचवड येथील प्रतिभा ग्रुप ऑफ इन्स्टिट्यूट तर्फे आयोजन

**। पिंपरी- चिंचवड । प्रतिनिधी : महाईन्यूज ।**

**पिंपरी चिंचवड : आपल्या संत भूमीचा, संत संस्कृतीचा वारसा अविरत चालू ठेवण्यासाठी , चिंचवड येथील प्रतिभा ग्रुप ऑफ इन्स्टिटयूट च्या प्रतिभा ज्युनिअर कॉलेजमध्ये आषाढी वारी निमित्ताने, महाविद्यालयाच्या इको क्लबच्या माध्यमातून "स्वच्छता वारीचे" नियोजन केले होते. त्यात १५०हून अधिक विधार्थीनी सहभाग नोंदविला .**




जगद्गुरु श्री संत तुकाराम महाराज पालखी सोहळा कार्यक्रमानंतर प्रतिभा ज्युनिअर कॉलेज इको क्लब ने "स्वच्छता वारी" अंतर्गत कचरा संकलन मोहीम आयोजित केली. या उपक्रमाचा उद्देश समाज आणि राष्ट्रांमध्ये स्वच्छतेचे महत्व व त्याबद्दल जागरूकता निर्माण करणे हा होता. कचरा संकलनामध्ये कला,वाणिज्य व विज्ञान शाखेच्या अनेक विद्यार्थ्यांनी पर्यावरणीय जबाबदारी मध्ये सामुदायिक सेवेला प्रोत्साहन देण्यात सक्रिय सहभाग घेतला . प्रतिभा कनिष्ठ महाविद्यालयाच्या उपप्राचार्या डॉ. वनिता कुऱ्हाडे यांच्या संकल्पनेतून आयोजित "स्वच्छता वारी" या कार्यक्रमास इको क्लबच्या समन्वयिका प्रा. सुनीता गायकवाड यांच्या पुढाकाराने आणि तसेच इतर सर्व इको क्लबचे उत्स्फूर्त सदस्य, सर्व प्राध्यापक सहकारी आणि विद्यार्थी यांनी हा उपक्रम पूर्णत्वास नेला. संस्थेच्या अध्यक्षा प्रतिभा शाह, सचिव डॉ दीपक शहा, त्याचबरोबर संस्थेच्या खजिनदार डॉ. भूपाली शहा व संचालिका तेजल शहा यांनीही या कार्यक्रमास प्रोत्साहन दिले.

# माटे हायस्कूलमध्ये योग दिन उत्साहात साजरा

## शिक्षण विश्व: विद्यार्थ्यांनी जाणून घेतले योगाचे महत्त्व

**। पिंपरी-चिंचवड । प्रतिनिधी : महाईन्यूज ।**


**जागतिक योग दिनानिमित्त व्ही के माटे हायस्कूल चिंचवडमध्ये योग प्रात्यक्षिकांचे आयोजन करण्यात आले होते.**



या कार्यक्रमासाठी प्रमुख पाहुणे म्हणून योगांजली स्टुडिओच्या संस्थापिका व संचालिका अंजली खोकले तसेच योग शिक्षिका संमेल साताळकर, अवंतिका पाटील होत्या. त्यांनी योगाचे आपल्या मानवी आयुष्यात ~~तील स्थान आणि महत्त्व पार्श्वभूमी~~ याबद्दल माहिती दिली. मोरया शिक्षण संस्थेच्या कार्यवाह तथा प्राचार्य इंद्रायणी माटे पिसोळकर यांनी कार्यक्रमाच्या प्रास्ताविकेत योग दिन संकल्पना -एक पृथ्वी एक आरोग्य - याचा अर्थ स्पष्ट करून सांगितला.तसेच मनाला आणि शरीराला शांतता देण्याचा दिवस म्हणजे 21 जून योग दिन या निमित्ताने शाळेचे आणि संस्थेचे यावर्षीची थीम संवर्धन वर्ष म्हणून साजरा करण्यात येत असल्याचे जाहीर केले. या संकल्पने अंतर्गत नाते संवर्धन ,आरोग्य संवर्धन, पर्यावरण संवर्धन, जलसंवर्धन ,याबद्दलही त्यांनी सविस्तर माहिती विद्यार्थी आणि शिक्षकांना दिली. माजी विद्यार्थ्यांनी विद्या गवस, अंजली खोकले आणि योग शिक्षिका मीनल साताळकर, जयश्री दाभाडे यांनी इयत्ता पाचवी ते दहावीच्या विद्यार्थ्यांकडून व शिक्षकांकडून योग प्रात्यक्षिके करवून घेतली.

या कार्यक्रमात मोठ्या संख्येने विद्यार्थी व शिक्षक सहभागी झाले होते . कार्यक्रमाला उपमुख्याध्यापक दिलीप कुमावत पर्यवेक्षिका मैत्रेयी राजे उपस्थित होते.पाहुण्यांचा परिचय अनिता बोरसे, कार्यक्रमाचे सूत्रसंचालन हनुमंत हुचगोळ यांनी केले तर राजश्री अवचरे यांनी आभार मानले.


Late Babanrao Gabaji Gawali Charitable Trust's
SPG INTERNATIONAL PUBLIC SCHOOL & JUNIOR COLLEGE
SPG INTERNATIONAL PUBLIC SCHOOL & JR. COLLEGE
WE MAKE YOUR FUTURE
Powered by
JAI HIND EDUTECH
CBSE Affiliation No. : 1130741 • UDISE Code - 27252001012
BHOSARI CAMPUS : Sr. No. 203, Nr. Durwankur Lawns, Alandi Road, Bhosari, Pune-411039 (Maharashtra)
SPG INTERNATIONAL PUBLIC SCHOOL
ADMISSION
OPEN
2025-2026
Pre Primary to Class XII
LIMITED SEATS
Hurry up!!!
Bi-focal / Technical / Vocational Subject are available
For Science Stream
Computer Science
Crop Science
Electronics
Mechanical / Technical Automobile
Information Technology (IT)
For Commerce Stream
Banking
Marketing & Sales
Office Management
Small Industries & Self employment
Information Technology (IT)
CALL NOW : 9763441639 / 8657473241


Priyadarshani
SCHOOL & JR. COLLEGE
ALANDI
PRIYADARSHANI GROUP OF SCHOOLS
42
Years of Excellence in Education
EDUCATING MIND & HEART
ADMISSIONS OPEN
FOR AY 2025-26
Holistic Empowering Learning
IT ALL STARTS HERE
42
YEARS OF ENRICHING EXPERIENCE OF EDUCATION
55+
NATIONAL & INTERNATIONAL AWARDS ACROSS OUR SCHOOLS
11+
CAMPUSES IN AND AROUND PUNE, MAHARASHTRA
17K+
17,000 STUDENTS ACROSS CAMPUSES
600+
TEACHING AND NON TEACHING STAFF
13K+
13,000 ALUMNI ACROSS GLOBE
PRIYADARSHANI GROUP OF SCHOOLS
BHOSARI | INDRAYANI NAGAR | MOSHI | CHAKAN | ALANDI | SHIVAJINAGAR | NANEKARWADI | WANOWRIE | SATARA
+91 8668755826
alandi@priyadarshanischools.org
www.priyadarshanischools.org


BLOSSOM YOUR KNOWLEDGE
Not just education, but
Personality
transformation.
ADMISSIONS OPEN for 2025-26
• CBSE curriculum
• Initiatives like 'Read-to-Lead'
• Tradition of 100% result
Gayatri English Medium School & Junior College, Charholi
95277 64646 / 77967 67292